**ARTHA**
( Fortnightly )
**Poona 4**
Tel. 55627

# अर्थ

**LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT**
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, ७ ऑक्टोबर, १९७० | अंक १९






आपल्या प्रेमाला मूर्त स्वरूप द्या : आपल्या प्रेमांतील माणसांच्या भविष्यकाळासाठी तरतूद करा. त्यांच्यासाठी बचतीस सुरवात करण्याची दीरंगाई करू नका. आपल्या मुलांच्या नांवाने बँक ऑफ इंडियामध्ये सेव्हिंग्ज बँक खाती उघडा.

**कोरडे प्रेम काय कामाचे...**

**बँक ऑफ इंडिया**

RAAS/B/1086 MAR.




® वरील ट्रेडमार्क किर्लोस्कर प्रोप्रायटरी लिमिटेड या कंपनीच्या मालकीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क असून किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड ही कंपनी त्याचा वापर करणारी अधिकृत कंपनी म्हणून नोंदविलेली आहे.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ७ ऑक्टोबर, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## प्रगत देशांतील आधुनिक तंत्र आत्मसात करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

### यंत्रांचा वापर, द्रव अमोनियाचा वापर, उपपदार्थांची निर्मिती, इत्यादींबाबत श्री. वसंतरावदादांचे मार्गदर्शन

महाराष्ट्र स्टेट को. बँकेच्या ५९ व्या वार्षिक साधारण सभेतील आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. वसंतरावदादा पाटील ह्यांनी कृषी औद्योगिक विकासासाठी नवा दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. शेती विकासासाठी उत्पादकता वाढविण्यासाठी आणि उत्पादनखर्च कमी करण्यासाठी प्रगत देशांतील अद्ययावत तंत्र आत्मसात करण्याचा सल्ला त्यांनी दिला आहे. ट्रॅक्टर, थ्रेशर हार्वेस्टर, पॉवर टिलर, यांसारखी यांत्रिक अवजारे अधिक प्रमाणात वापरायला हवीत. यातून बेकारी वाढेल की काय, अशी शंका येणे रास्त आहे. परंतु खेड्यात आजही मजुरीचे दर सारखे वाढत आहेत. तेव्हा बेकारीची समस्या टाळण्यासाठी अन्य उपाय योजावे, पण शेतीच्या कामासाठी यंत्रांचा वापर अटळ वाटतो, असे स्पष्ट मार्गदर्शन श्री. वसंतरावदादांनी केले आहे. कमाल जमीन धारणेच्या क्षेत्रमर्यादेसंबंधी सध्या चालू असलेल्या चर्चेच्या संदर्भात वरील उद्गारांचे विशेष महत्त्व आहे.

उत्पादनखर्चात खताचा खर्च फार मोठा असतो. हाही कमी व्हायला हवा. पिकाच्या वाढीसाठी आवश्यक मुख्य पोषणद्रव्य म्हणजे नायट्रोजन. मात्र नायट्रोजन मूळ स्वरूपात पिकांना पुरविण्याऐवजी अमोनियम सल्फेट, युरिया इत्यादींमध्ये मिसळून दिला जातो. सध्या प्रचलित असलेल्या खतांपैकी यूरियामध्ये नायट्रोजन प्रमाण ४६ टक्के असते. अमोनियम सल्फेटमध्ये हे प्रमाण २१ टक्के असते. अमोनियम क्लोराइड मध्ये २५ टक्के असते. या खतामध्ये नायट्रोजनचे प्रमाण अल्प असते हे यावरून दिसून येईल. याऐवजी द्रव अमोनियाच्या स्वरूपात नायट्रोजन पिकांना देण्याचे तंत्र अमेरिकेमध्ये सररास वापरले जाते. अमोनियामध्ये नायट्रोजनचे प्रमाण ८२ टक्के असते. अमेरिकेतील अमोनियाच्या एकूण उत्पादनापैकी सुमारे ४० टक्के उत्पादन अशा तऱ्हेने प्रत्यक्षपणे पिकांना पुरविण्यात येते. जिथे पाटाचे पाणी आहे तिथे अमोनिया पाण्यात मिसळून देता येईल. कोरडवाहू भागात इंजेक्शन पद्धतीनेही अमोनिया देता येतो.

आपल्याकडेही अमोनियाचा शुद्ध स्वरूपात पिकांना पुरवठा करण्याचे प्रयोग व त्यासाठी आवश्यक ती साधनसामग्री बनविण्याचे विचार ट्रॉम्बे येथील फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि फर्टिलायझर्स केमिकल्स लि., त्रावणकोर यांनी अलीकडेच सुरू केले आहेत. या तंत्राचा अवलंब आपल्या देशात फार मोठ्या प्रमाणावर व्हावयास हवा, असे या पद्धतीचा परिणामकपणा पाहून श्री. वसंतरावदादा ह्यांचे मत बनलेले आहे. त्यामुळे नायट्रोजनसाठी आज शेतकऱ्याला कराव्या लागणाऱ्या खर्चामध्ये सुमारे अर्ध्याने तरी बचत होईल असे यासंबंधीच्या आकडेवारीवरून दिसून येते.

खताचा खर्च कमी करण्याबरोबरच वाया जाणाऱ्या पदार्थांपासून उपयुक्त वस्तू निर्माण करूनही साखर, तेल, इत्यादी वस्तूंच्या किंमती कमी करण्याच्या दृष्टीने विचार व्हावयास हवा. कापसाच्या सरकीपासून तेल, उसाची चिपाडे, शेंगांची टरफले यांपासून कागद व हार्ड-बोर्ड, मळीपासून अल्कोहोल व यीस्ट इत्यादी वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी कसोशीचे प्रयत्न होणे आवश्यक आहे. द्राक्ष उत्पादनामध्ये अलीकडे मंदीची परिस्थिती आलेली आहे. सबब वायनरी काढण्यासाठीही सहकारी संस्था स्थापन करून पुढाकार घ्यायला हवा असे श्री. वसंतरावदादा ह्यांनी सांगितले.

---

## आयुर्विमा मंडळाकडे घरांसाठी कर्जाची मागणी

मध्यवर्ती गृहनिर्माण मंडळाने घरबांधणी योजनांसाठी आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून १० कोटी रुपये आणि युनिट ट्रस्टकडून २ कोटी रुपये कर्ज काढण्याचा निर्णय घेतला आहे. घरबांधणीच्या कार्यक्रमासाठी मंडळाने २०० कोटी रुपयांचा फिरता निधी उभारला आहे. चालू आर्थिक वर्षात निर्यात भर घालण्यासाठी ही कर्जे मागण्यात येत आहेत. आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाला सरकारने ‘मान्य गुंतवणूक’ म्हणून मंजुरी द्यावी अशी विनंतीही करण्यात आली आहे. राज्यांच्या गृहनिर्माण मंडळांना मध्यवर्ती मंडळ एक महिन्याच्या अवधीत कर्जे देऊ शकेल असा अंदाज अधिकारी गोटात करण्यात येत आहे. केंद्रशासित प्रदेश आणि राज्य सरकार ह्यांच्याकडून १५० गृहनिर्माण योजना मंडळाकडे आलेल्या आहेत. सर्व योजनांना मिळून ६५० कोटी रुपये भांडवल लागेल.

---

### बँकांमधील ठेवींबद्दल सुरक्षितता वाटली पाहिजे

देशातील १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आल्यानंतर ह्या धंद्याच्या भवितव्याविषयी विविध दृष्टिकोनांतून चर्चा झाली. ह्या बँकांच्या भागधारकांना सरकारकडून नुकसानभरपाई जाहीर झालेली आहे. तेव्हा त्यांच्यापुरता बँकिंगचा प्रश्न मिटल्यासारखा आहे. बँकिंगच्या धंद्यात ठेवीदारांचा विश्वास हे अदृश्य स्वरूपाचे भांडवलच म्हणता येईल. बँकांनी अधिक सुलभ अटींवर कर्जे देण्यास प्रारंभ केल्यापासून ठेवींच्या सुरक्षिततेबद्दलही चर्चा होऊ लागल्यास नवल नाही. कारण, कर्जे देण्याच्या बाबतीत नव्या धोरणाप्रमाणे तारणाचा प्रश्न गौण मानला जाऊ लागला. ठेवींच्या सुरक्षिततेबद्दल म्हैसूरच्या शेती मंत्र्यांनी बंगलोर येथे बोलताना काही विचार व्यक्त केले आहेत. कॅनरा बँकिंग कॉर्पोरेशनने बँकांत काम करणाऱ्या नोकरांसाठी भरविलेल्या ' वर्कशॉप ' मध्ये ते बोलत होते. आपल्या भाषणात ते म्हणाले, " ग्रामीण भागांतून ठेवी गोळा करण्याचा उपक्रम बँकांनी आता हाती घेतला आहे. परंतु ह्याबाबतीत एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ग्रामीण भागांतील लोकांना आपल्या ठेवींबद्दल विश्वास वाटला पाहिजे. काही विवक्षित रकमांच्या पलीकडील ठेवींवर एकाएकी कर बसविण्यात येईल अशी भीती ठेवीदारांना वाटता कामा नये. कारणे काहीही असोत, पण ग्रामीण भागांतील ठेवीदारांत अशा प्रकारची चिंता निर्माण झाली आहे ह्यात शंका नाही. ह्या चिंतेचे निराकरण करण्यात आले नाही तर ग्रामीण भागांतील ठेवी जमविण्याच्या बँकांच्या कार्यक्रमांत अडथळे उत्पन्न होतील. " मध्यवर्ती सरकारच्या अर्थखात्याच्या एका प्रमुख अधिकाऱ्याने ही चिंता निराधार असल्याचे सांगितले.

---

### खेळत्या चलनाच्या बाबतीत स्वित्झर्लंड अग्रेसर

स्वित्झर्लंडमध्ये दरमाणशी खेळते चलन, अमेरिकन डॉलरच्या हिशेबात ( ५१६ डॉलर्स ) आहे. त्या खालोखाल बेल्जम ( ३६८ डॉलर ), स्वीडन ( २६८ डॉलर ), फ्रान्स ( २५७ डॉलर ), नॉर्वे ( २३७ डॉलर ), अमेरिका ( २२९ डॉलर ), कुवेत ( २१६ डॉलर ), नेदरलंड्स ( २०२ डॉलर ) आणि ऑस्ट्रिया ( १८१ डॉलर ) असा अनुक्रम लागतो. दरमाणशी १०० डॉलर चलन असणारा देश श्रीमंत समजायला हरकत नाही.

---

### कृष्ण, बालकृष्ण, गोपालकृष्ण आणि राघव

केरळ राज्याच्या विधान सभेतील फक्त ७४ सभासदांना वेगवेगळी नावे आहेत; सहा कृष्ण आहेत, चार कुंजकृष्ण आहेत, तीन बालकृष्ण आहेत, दोन गोपालकृष्ण आहेत. चार राघव आहेत आणि तेरा जणांची जोडनावे आहेत. म्हणजे, ५९ सभासदांच्या नावात २३ नावे पुनः पुनः आली आहेत.


**सरदारगृह**

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**महाराष्ट्रातील नामवंत बँक**

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना - १९३६

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

**सातारा**

रजिस्टर्ड ऑफिस : १४३–१४६, भवानी पेठ, सातारा शहर.

आपल्या ४७ शाखांनिशी आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात तत्पर.

खेळते भांडवल : १२ कोटींचे वर
ठेवी : ११·७५ कोटींचे वर

ठेवींचे आकर्षक व्याजाचे दर.
तऱ्हेतऱ्हेच्या उद्योगधंद्यांस साहाय्य.
कोणत्याही शाखेस भेटा अगर लिहा.

**वि. श्री. दामले**
बी. ए., एम्. कॉम्., एलएल्. बी.,
सी. ए. आय्. आय्. बी. चेअरमन

## सेंट्रल बँकेचे पुणे येथील प्रशिक्षण केंद्र

राष्ट्रीयीकरण हे एक साधन आहे. त्या साधनाच्या द्वारे समाजातील बऱ्याच गोष्टी साध्य करावयाच्या आहेत. त्यासाठी बँकांचा कारभार पाहणारे कर्मचारी व अधिकारी वर्ग हा ह्या बाबतीत फारच हुशार, तल्लख व तत्पर सेवा करणारा असला पाहिजे आणि त्यासाठी आज त्यांना योग्य ते शिक्षण देण्याची जरुरी आहे. शिक्षणावरील खर्च ही एक प्रकारची भांडवली गुंतवणूकच आहे.

सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया ही एक १४ राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांमधील प्रथम क्रमांकाची बँक आहे. ह्या बँकेने आपल्या नोकरवर्गाला व अधिकाऱ्यांना योग्य ते शिक्षण देण्यासाठी, देशातील प्रमुख अशा शहरांतून जवळजवळ ३२ प्रशिक्षण केंद्रे उघडली आहेत. ह्या प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व जुने नोकरवर्ग, अधिकारीवर्ग ह्या सर्वांना शिक्षण देण्याची सोय केली आहे. ह्या ३२ प्रशिक्षण केंद्रांपैकीच पुणे येथे पण ( शिवाजीनगर भागात ) एक प्रशिक्षण केंद्र दिनांक ७ डिसेंबर १९६९ रोजी उघडण्यात आले आहे. हे केंद्र पुणे कॅम्प शाखेच्या देखरेखीखाली चालविले जाते.

ह्या केंद्रात पुणे विभागातील सर्व शाखांतील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे व आतापर्यंत सोलापूर, कोल्हापूर, सांगली, बार्शी, कऱ्हाड, नांदेड, राहुरी, जालना, माळीनगर, औरंगाबाद, श्रीगोंदा, पेठ, सहजानंदनगर, गणेशनगर व पुणे येथील शाखांमधील काम करणाऱ्या बँक कर्मचाऱ्यांना शिक्षण देण्यात आले आहे. आतापर्यंत १५० कर्मचाऱ्यांना ह्या प्रशिक्षण केंद्रामधून शिक्षण दिले गेले आहे. जास्त सखोल व प्रोत्साहनात्मक शिक्षण देण्यावर बँकेने भर दिला आहे.

प्रत्येक तुकडी ही फक्त १५ कर्मचाऱ्यांचीच असते. कारण त्यामुळे प्रशिक्षण अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांकडे जास्त जवळून व वैयक्तिक लक्ष देता येते. तसेच कर्मचाऱ्यांची संख्याही मर्यादित असल्यामुळे त्यांच्यामध्येच एकमेकांना आचार-विचारांची देवाण-घेवाण होऊन अभ्यास-विषयाला एक प्रकारची गोडी निर्माण होते. तसेच प्रशिक्षण अधिकाऱ्यांना पण कर्मचाऱ्यांच्या सामान्य ज्ञानाची लवकर कल्पना येऊन त्याप्रमाणे त्या तुकडीच्या पातळीप्रमाणे शिकविता येऊन विषयात रस उत्पन्न करता येतो. ह्या प्रत्येक तुकडीची मुदत ही प्रथम १५ दिवसच ठेवण्यात आली होती. परंतु नंतर ती २१ दिवस ठेवण्यात आली.

अशा तऱ्हेने प्रत्येक कर्मचाऱ्याला प्रत्यक्ष कामाची, पुस्तकीय ज्ञानाची व व्यावहारिक ज्ञानाची सर्वांगसुंदर अशी माहिती प्राप्त झाल्यामुळे बँक कर्मचारी कुठल्याही टेबलावर काम करण्यास प्रवृत्त होऊन ते काम सहजतेने व सुलभ रीतीने पार करून जास्तीत जास्त सेवा बँक ग्राहकांस देते.

ह्या प्रशिक्षण केन्द्राची सर्व व्यवस्था पुणे विभागाचे प्रमुख श्री. एस. आर. टिपणीस हे स्वतः जातीने पाहात असतात. कर्मचाऱ्यांच्या अडी-अडचणी समजावून घेणे, त्यांना लागणारी पुस्तके व इतर अनेक उपयुक्त गोष्टी ह्यांची वैयक्तिक रीत्या विचारपूस करणे, कुठल्याही कर्मचाऱ्यांच्या योग्य व चांगल्या कार्याला प्रोत्साहन देणे, ह्या त्यांच्या सर्वांगिक गुणामुळे केंद्राला एक प्रकारचा लौकिक मिळाला आहे. त्याचप्रमाणे सेंट्रल बँकेचे मुंबई येथील मॅनेजमेंट डेव्हलमेंट डिपार्टमेंटचे प्रमुख श्री. एच. डी. मेहता यांचेपण बरेच उत्स्फूर्तदायक असे सहकार्य केंद्राला लाभत असल्यामुळे त्याला एक प्रकारची निराळीच गती मिळाली आहे.

ह्या प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख प्रशिक्षणाधिकारी श्री. ए. व्ही. जोगळेकर व श्री. ए. व्ही. जाधव हे दोघे अत्यंत घरगुती व खेळीमेळीच्या स्वरूपात बँक कर्मचाऱ्यांना शिक्षण देतात. हे दोघे ह्याच बँकेतील अनुभवी अधिकारी आहेत. त्यांना ह्या नवीन क्षेत्रात येण्यापूर्वी सखोल मार्गदर्शन देण्यात आलेले आहे. तसेच बँक कर्मचाऱ्यांना शिक्षण देण्याची त्या दोघांची जी कला आहे त्याला विद्यार्थ्यांच्याकडूनही भरपूर प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे शिक्षण केंद्र न म्हणता ट्रेनिंग वर्कशॉप असे म्हणणेच जास्त योग्य आहे.

---

## कॉसमॉस बँकेचे नवे पदाधिकारी

दि कॉसमॉस अर्बन को. बँक लि. च्या १९७०-७१ च्या अधिकार मंडळात पुढीलप्रमाणे निवडून आले आहेत.

सल्लागार मंडळ अध्यक्ष :— श्री. शं. वि. दिवाकर

सल्लागार मंडळ उपाध्यक्ष :— श्री. श्री. म. लेले

कार्यकारी मंडळ अध्यक्ष :— श्री. अ. बा. देहाडराय

कार्यकारी मंडळ उपाध्यक्ष :— श्री. म. ना. परांजपे,

कार्यकारी मंडळ सभासद :— सर्वश्री. सु. मा. कुलकर्णी, द. ग. देव, वा. र देशपांडे, ह. गो महाजन, स. स. देशपांडे, बा. का. पराड, अ. य. शालिग्राम, शं. गो. कर्वे, मा. ग. रुद्रदे आणि ना. प. कुलकर्णी, श्री. व. गं बर्वे हे व्यवस्थापक आहेत.

---

## अर्थ दिवाळी अंक

"अर्थ"चा येता अंक दिवाळीनिमित्त नेहमीप्रमाणे मोठ्या स्वरूपात प्रसिद्ध होईल. तो येथून दि. २७ रोजी रवाना होईल.

त्यानंतरचा, ४ नोव्हेंबरचा अंक दिवाळीच्या सुट्टीमुळे बंद राहील.

—संपादक

## कापूस व्यापाराचे राष्ट्रीयीकरण आणि एकाधिकार कापूस खरेदी

(श्री. भारत गुलाबचंद दोशी ह्यांचे महाराष्ट्र चेंबरच्या तृतीय त्रैमासिक सभेतील भाषण)

कापडाचा आयात व्यापार आपल्या ताब्यात घेण्याचे धोरण शासनाने निश्चित केले असून भारतीय कापूस महामंडळाची स्थापना नुकतीच झाली आहे. या धोरणाच्या निषेधार्थ गेले काही महिने देशात कापड व्यापारात गुंतलेल्या घटकांनी अनेक आंदोलने उभारली, मोर्चे काढले, निदर्शने केली. महाराष्ट्रातही महाराष्ट्र सरकार कापसाच्या एकाधिकार खरेदीची योजना आखीत आहे. सहकार मंत्री ना. यशवंतराव मोहिते यांनी याबाबत विधानसभेच्या गेल्या अधिवेशनात एक श्वेतपत्रिका सादर केली. तसेच दिल्लीला जाऊन कापूस खरेदीची आपली योजनाही केंद्र सरकारपुढे सादर केली. ना. मोहिते यांनी "को-ऑपरेटिव्ह, मुव्हमेंट इन महाराष्ट्र स्टेट-ए रिॲप्रेझल" हा ग्रंथ नुकताच लिहिला आहे. या ग्रंथात त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात कापसाची एकाधिकार खरेदी करण्यात यावी अशी शिफारस केली असून सध्या या धंद्यात असणाऱ्या खाजगी संस्थांऐवजी सहकारी संस्थांच्या हातात हा कारभार देण्याचे सुचविले आहे. अशा प्रकारचा क्रांतिकारक बदल करण्याचे कारण शेतकऱ्यांना "जास्तीत जास्त किंमत मिळावी" हे आहे असेही सांगितले जाते. सदर योजनेनुसार शेतकऱ्याने आणलेला सर्व कापूस सहकारी संस्थेस दिला जाईल. सहकारी संस्था मागील तीन वर्षांच्या सरकारी किंमतीच्या कमीत कमी ९० टक्के रक्कम त्या कापसाचा भाव म्हणून देईल. वरवर पाहता ही योजना अत्यंत व्यवस्थित आणि शेतकऱ्यांचा फायदा करणारी दिसत असली तरी प्रत्यक्षात या योजनेमागे अनेक धोके व दोष दडलेले आहेत. या योजनेतील किंमत निश्चितीच्या सरासरी काढण्याच्या पद्धतीमुळे अनेकदा शेतकऱ्याला कमी किंमत स्वीकारावी लागून नुकसान सहन करावे लागते. तसेच या पद्धतीमुळे बाजारपेठेतील स्पर्धा पूर्णपणे नाहीशी होऊन एकाधिकार खरेदीत जी किंमत ठरेल तीच घ्यावी लागेल. त्यामुळे उच्च प्रतीचा कापूस बाजारपेठेत न येण्याची मोठीच शक्यता आहे. सहकारी संस्थांचा आजचा कारभार कसा चालू आहे त्याचा अनुभव सर्वांसमोर आहे. तेव्हा त्यात सहकारी तत्त्वावर कापूस खरेदीची भर घालून शासन काय साधणार आहे?

या योजनेमुळे कापूस व्यापारातून व्यापारी वर्गाचे संपूर्ण उच्चाटन होणार असून व्यापारी विरुद्ध शेतकरी असा असंतोषही वाढीला लागण्याची भीती आहे. अशा अनेक नव्या समस्यांना आमंत्रण देणारी कापूस आयातीच्या राष्ट्रीयीकरणाची आणि एकाधिकार कापूस खरेदीची योजना आर्थिक क्षेत्रात वाढता गोंधळ निर्माण करणारी ठरू नये.

### महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी ऑक्सफॅमचा नवा पंप

ऑक्सफॅम या ब्रिटिश सेवा संस्थेने पाठविलेल्या व महाराष्ट्रात विहिरी खणण्याच्या प्रकल्पांत काम करीत असलेल्या ब्रिटिश स्वयंसेवकांनी एक सुधारित प्रकारचा पंप तयार केला आहे. हा पंप इतका यशस्वी ठरला की तो भारतातील दुसऱ्याही भागात वापरला जाईल.

या ब्रिटिश स्वयंसेवकांच्या पथकाचे नेतृत्व डॉ. ख्रिस्तोफर विगलसवर्थ यांच्याकडे आहे. जालना येथील आपल्या मेंटेनन्स वर्कशॉपमध्ये या पथकाने या पंपाची रचना व निर्मिती केली. या पंपात नरम पोलाद व पितळ यांचा वापर केलेला असून तो दणकट बांधणीचा आहे. त्यातील हलक्या भागांसाठी आता प्लॅस्टिकचा वापर करण्याचा हे पथक प्रयत्न करून पाहात आहे.

महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांत आतापर्यंत २०० पंप बसविण्यात आलेले आहेत. दुसऱ्या दोन विकास प्रकल्पांसाठी ब्ल्यूप्रिन्ट्स पुरविण्यात आलेले आहेत आणि आणखी ५० पंप खेड्यांत बसविण्यात आले आहेत.

---

**गर्भपातांच्या संख्यावाढीचा परिणाम**—गर्भपाताचा कायदा सौम्य केल्यापासून ग्रेट ब्रिटनमधील इस्पितळांतून गर्भपाताचे काम खूपच वाढले आहे आणि त्यामुळे तेथील डॉक्टरांवर ताण पडत आहे.

**परदेशी विद्यार्थ्यांतील नापासांचे प्रमाण**— ग्रेट ब्रिटन-मधील विद्यापीठात शिकत असलेल्या प्रत्येक चार विद्यार्थ्यांपैकी एक विद्यार्थी तरी नापास होतो किंवा शिक्षण तरी सोडून देतो, असे एका पाहणीत आढळून आले आहे.

**शिंक महाग पडली**—सटाणा (नाशिक) येथील सिव्हिल कोर्टातील एका प्रेक्षकाला आलेली शिंक खूपच महाग पडली. कारण, शिंक येणाऱ्याला—केदु कुलुवानीला—कोर्टाने तात्काळ २०० रु. दंड केला. केदूने दंड भरला, परंतु तो वरिष्ठ कोर्टाकडे अपील करणार आहे.

**कुवाइतला केळ्यांची निर्यात**—अरबस्थानातील कुवाइत ह्या देशाला १९७१ च्या एप्रिल महिनाअखेरपर्यंत ९ हजार टन केळी निर्यात करण्याचा करार करण्यात आला आहे. ह्यापैकी ३,६०० टन केळी गुजरात राज्याची सहकारी फळे आणि भाजीपाला संघटना पुरविणार आहे. उरलेली ५,४०० टन केळी जळगावमधील सहकारी विक्री संघटना पुरविणार आहे.

**छोटे दूरदर्शन उपकरण**—एका अमेरिकन कंपनीने 'मिनिस्कोप' ह्या नावाचे एक छोटे दूरदर्शन उपकरण बनविले आहे. हे उपकरण मोटार सायकलवर बसताना घालणाऱ्या शिरस्त्राणासारखे डोक्याला बसविता येते. त्याच्या साह्याने विशेष प्रकारच्या एका चष्म्याने पडद्यावरील दृश्ये बघता येतात. ह्या उपकरणातील पडदा ०.९ इंच व्यासाचा आहे. दृश्ये पाच अष्टमांश गुणिले तीन चतुर्थांश इंचाची असतात.

# भारतामधील जिराइत शेतीच्या अभ्यासाला महत्त्व

भारतामधील जिराइत म्हणजे निव्वळ पाऊसपाण्यावर अवलंबून असणाऱ्या शेतीच्या अनेकविध प्रश्नांवर अद्याप फारसा विचार झालेला नाही. त्या दृष्टीने हैद्राबाद येथे भरणाऱ्या अखिल भारतीय वर्कशॉपचे महत्त्व विशेष आहे. ह्या वर्कशॉपच्या अनुषंगाने जिराइत शेतीसंबंधीच्या अनेक प्रश्नांवर विचारविनिमय होणार आहे. विचारविनिमयात भाग घेण्यासाठी आणि शेतकऱ्याला सल्लामसलत देण्यासाठी कॅनडाचे एक प्रतिनिधी-मंडळ भारतात येणार आहे. ते आपल्याबरोबर शेतीला उपयोगी अशी काही यंत्रेही आणणार आहेत. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अन्वये जिराइत शेतीचा विकास साधण्यासाठी २० विभाग स्थापना करण्यात येणार आहेत. त्यांच्या स्थापनेसाठी २० कोटी रुपये खर्च करण्यात येतील. ह्या विभागांपैकी ९ विभागांची स्थापना झालेलीच आहे. दरम्यान हैद्राबाद येथे बोलताना इंडियन कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल रीसर्च ह्या संस्थेचे उपसंचालक डॉ. जे. एस. कनवार ह्यांनी शेतीच्या व्यवसायासंबंधी चिंतनीय विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की हिंदमधील ८० टक्के जमीन अजूनही ओलिताखाली आलेली नाही; आणि आणखी कितीतरी वर्षे ह्या परिस्थितीत फारसा फरक पडण्याची शक्यताही नाही. म्हणूनच जिराइत शेती करण्याच्या पद्धतीकडे पुरेसे लक्ष देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ह्या पद्धतीत लवकर सुधारणा करण्यात आली नाही तर देशाला नजीकच्या काळातच कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. जिराइत शेतीच्या अभ्यासात जमिनीच्या रचनेला फार महत्त्व आहे.

जिराइत शेतीचा विकास करण्यासाठी जारीने प्रयत्न करणे निकडीचे झाले आहे. अशा शेतीचे दर एकरी उत्पादन वाढविण्यासाठी कोणताही मार्ग शिल्लक ठेवता कामा नये. जिराइत शेताची नांगरणी खोलवर करण्यात आली पाहिजे. ज्या ठिकाणी अशी नांगरट करण्यात आली तेथे अनुभव चांगला आला आहे. पावसाचे पाणी जमिनीत किती मुरते आणि तीमधील ओल किती काळ टिकून राहते ह्या प्रश्नाला फार महत्त्व आहे. पाण्याचा मुरावा होण्यास व ओल टिकून राहण्यास खोल नांगरणीचा चांगला उपयोग होतो. म्हणून ह्या प्रश्नाचा तातडीने विचार करण्यात आला पाहिजे. ज्या जमिनींना हुकमी पाणी मिळते अशा बागाइत जमिनीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यात आला पाहिजे. सध्या ह्या जमिनीचा जितका उपयोग करता येणे शक्य आहे त्याच्या एक अष्टमांश अगर एक षष्ठांश उपयोग केला जात आहे. ह्या शेतीसंबंधी आणखी एक महत्त्वाची बाब लक्षात ठेवली पाहिजे. बागायती खालील जमिनीचा अनेक वर्षे उपयोग केल्यावर तिचा कस कसा व कितपत राहील ह्याचा शास्त्रज्ञांनी अभ्यास केला पाहिजे. जपानमधील सकस शेतीचे, विशेषतः भातशेतीचे, अनुकरण करण्यास भारतात उत्तेजन दिले जात आहे. परंतु तेथील तंत्र येथे तंतोतंत वापरणे योग्य होईल की काय ह्याचा विचार झाला पाहिजे. भारतामधील भातशेतीत पाण्याचा वापर काटकसरीने करण्यात येत नाही. जपानमध्ये जमिनीच्या एका घटकासाठी जितके पाणी वापरले जाते त्याच्या चौपट पाणी भारतात उपयोगात आणले जाते. त्यामुळे बरेच पाणी झिरपून बाहेर जाते आणि त्याबरोबर घातलेली खतेही वाया जातात. ही नुकसानी टाळण्यात आली पाहिजे.

---

### इंडियन हॉटेल्सची नवी योजना

मुंबई येथील सुप्रसिद्ध ताजमहाल हॉटेल हे इंडियन हॉटेल्स कं. लि. च्या मालकीचे आहे. सध्याच्या हॉटेलची इमारत वाढवून जास्त उतारूंची व्यवस्था करण्यासाठी १·९० कोटी रु. ची योजना कंपनीने आखली आहे. त्याखेरीज, ४·४० कोटी रु. खर्चून पूर्वी जेथे ग्रीन्स हॉटेल होते तेथे नवे हॉटेल उभारण्यात येणार आहे. इमारतींच्या बांधकामावर आणि सुखसोईंच्या निर्मितीवर देखरेख ठेवण्याचे काम इंटरनॅशनल कॉन्टिनेन्टल हॉटेल्स कॉर्पोरेशन ऑफ यू. एस. ए. कडे सोपविण्यात येईल. पैशाची व्यवस्था पुढीलप्रमाणे केली जाईल :— (१) शेअर्स विकून (प्रत्येकी १० रु. चे ११·५ लक्ष इक्विटी शेअर्स आणि ९·३% व्याजाचे प्रत्येकी १०० रु. चे ५५,००० प्रेफरन्स शेअर्स) (२) बँक ऑफ बरोडाकडून ३० लक्ष रु. कर्ज, (३) हॉटेल डेव्हलपमेंट बोर्डाकडून २५ लक्ष रु. कर्ज, (४) इंडस्ट्रिअल के. अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनकडून ७१ लक्ष रु. आणि (५) हॉटेल डेव्हलपमेंट फंडाकडून ५० लक्ष रु. ह्याखेरीज, बँकर्सकडून २·५ कोटी रु. घेतले जातील.

---

### ब्रिटिश यंत्रतज्ज्ञांची भारताला भेट

ब्रिटनच्या यांत्रिक हत्याराच्या कारखानदारांचे एक प्रतिनिधी मंडळ लवकरच भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या आमंत्रणाने ते येत आहे. भारतात तयार होणाऱ्या यांत्रिक हत्यारांत अधिक विविधता आणण्यास आणि त्यांची निर्यात वाढविण्यास कितपत वाव आहे ते तपासून पाहण्याची कामगिरी मंडळ करणार आहे. काही ब्रिटिश कारखानदार स्वतःच्या कारखान्यातील काही यांत्रिक हत्यारे भारतात बनविण्यासंबंधी वाटाघाटीही करीत आहेत. ब्रिटन परदेशांकडून दरसाल सुमारे ५ कोटी डॉलर्सच्या यांत्रिक हत्यारांची आयात करते. ब्रिटनमधील ह्या मालाच्या बाजारपेठेत हिंदी मालाला अधिक उठाव देण्याचे प्रयत्न चालू आहेत. सध्या भारत ब्रिटनला दरसाल फक्त ४१ लाख रुपयांची यांत्रिक हत्यारे पुरवितो.

चवदार पिठासाठी

**पिठाँच्या चक्क्या**

- बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
- मजबूत बांधणी
- अद्यावत् यंत्र योजना
- साईज १४", १६", १८"

फोन नं. १६९



उत्पादक –

**भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि. सांगली**

**महाराष्ट्र राज्य.**



स्थापना १९११

**माकडछाप**

म्हणजेच

**काळी टूथपावडर**

नोगी आणि कंपनी प्रा. ली.
मुंबई ६१ ओ. अेस.


सोल सेलींग अेजन्टस्


**नोगी सेल्स् कॉर्पोरेशन**

१७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.

MARATHI


---

इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग–सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३२ तार : Vijayplow

## केळयाच्या नव्या जातीचा शोध व लागवड

आंध्र प्रदेशातील केळयाचे एक बागाइतदार श्री. भास्कर राजु ह्यांनी सतत १० वर्षे चिकाटीने प्रयोग करून केळयाची एक नवीन जात शोधून काढण्यात यश मिळविले आहे.. आंध्रमधील पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील एका खेड्यात त्यांची बागायती आहे. बागायतीचे क्षेत्र सुमारे ३० एकर असून त्यात ते ह्याच जातीच्या केळयांची लागवड करीत असतात. ह्या नवीन प्रकारच्या केळयाच्या फळाची लांबी १४ इंच असते आणि जाडी सुमारे २॥ इंच असते. त्याचा रंग सोन्यासारखा पिवळा धमक असतो. केळयाला त्यांनी स्वतःचेच म्हणजे 'भास्कर केळे' असे नाव दिलेले आहे. सध्या ह्या केळयांची निर्यात युरोपमधील ६ देशांना करण्यात येत आहे. त्यात ब्रिटनचाही समावेश आहे. हिंदमधील केळयांना परदेशी बाजारपेठा मिळवून देण्याच्या कामी त्यांचा चांगला उपयोग होत आहे. श्री. राजु ह्यांना १९६० साली प्रथम केळयाच्या नेहमीच्या स्वरूपात एकदम मोठा बदल घडवून आणण्यात यश लाभले. त्यानंतरही त्यांनी सतत प्रयोग चालू ठेवून सध्याची नवीन जात शोधून काढली. नवीन केळे अतिशय गोड असते आणि विशेष म्हणजे ते इतर केळयांच्या मानाने अधिक काळ न नासता टिकून राहते. केळी परदेशी निर्यात करण्याच्या खटाटोपात ह्या गोष्टीला फार महत्त्व आहे. कारण, परदेशी पाठविण्यात आलेली केळी फार मोठ्या प्रमाणावर वाटेत खराब होतात असा अनुभव आहे. श्री. राजु सध्या दर आठवड्याला २५ हजार केळी दिल्लीला पाठवीत आहेत. दिल्लीतील अलिशान हॉटेलातून १२ रुपये डझनाने ती खपत आहेत. ह्याच केळयांची परदेशात पाठविण्याची किंमत २४ रुपये डझन इतकी आहे. भारतात दर साल ३ कोटी टन केळी पिकतात व त्यातील ५ हजार टन निर्यात होतात.

## आगगाडीच्या उतारूंसाठी नवे डबे

येत्या काही वर्षात भारतामधील रेल्वेमार्गावर धावणारे उतारूंच्या वाहतुकीचे फार जुने झालेले डबे बदलून त्यांच्या जागी नवे डबे जोडण्यात येणार आहेत. रेल्वेतील ३३ हजार उतारू वाहतुकीच्या डब्यांपैकी २२ टक्के डबे बरेच जीर्ण झालेले आहेत. प्रवाशांच्या संख्येत अपेक्षेबाहेर वाढ झाल्याने असे डबेही नाइलाजाने वापरावे लागत आहेत. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ३,३४० जुने डबे काढून घेऊन त्यांच्याऐवजी नवीन डबे वापरात येऊ लागतील असा अंदाज आहे. सध्या भारतामधील दोन रेल्वे डब्यांच्या कारखान्यात दरसाल सुमारे ९०० डबे तयार होतात. चौथ्या कार्यक्रमाअखेर उत्पादनक्षमता १,१५० डबे करण्याचे प्रयत्न होत आहेत.

## नैसर्गिक अवस्थेतील अन्नपदार्थ खाण्याची लाट

अमेरिकेतील लोकांच्या आहाराच्या सवयीत फार मोठा बदल घडून येत आहे. त्या देशात हवाबंद डब्यांतील अन्नपदार्थ वापरण्याची पद्धत दृढमूल झालेली होती. पण असे पदार्थ करताना त्यावर रासायनिक संस्कार करावे लागतात. शिवाय, तेथील शेतींत डी. डी. टी. सारख्या कीडनाशक रसायनांचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येतो. त्यामुळे पिकांचे संरक्षण होत असले तरी रासायनिक औषधाचा काही भाग खाद्यपदार्थांत उतरतो. अन्नावाटे आपल्या शरीरात घातक विखार जाण्याची भीती अमेरिकन लोकांत वाढत्या प्रमाणात पसरत आहे. ह्या प्रश्नाकडे लक्ष वेधणारे पहिले पुस्तक १९६२ साली प्रसिद्ध झाले. तेव्हापासून अन्नपदार्थांतील विषारी घटकांकडे सतत लक्ष वेधणारे वाङ्मय निर्माण होत आहे. त्याचा परिणाम होऊन अनेक अमेरिकन नागरिक स्वतःचा भाजीपाला स्वतःच्या बागेत निर्माण करू लागले आहेत. ह्या बागेत फक्त नैसर्गिक खतांचा उपयोग करण्यात येतो आणि रासायनिक संस्कार अगदी किमान इतकाच करण्यात येतो. ह्या विषयासंबंधी माहिती देणारे एक मासिक अमेरिकेत प्रसिद्ध होत असते त्याचा खप २ वर्षांपूर्वी अवघा ६० हजार होता. अमेरिकेंत नैसर्गिक रीत्या पिकविलेल्या आणि टिकविलेल्या अन्नपदार्थांचा वापर वाढीस लागल्यापासून ह्या मासिकाचा खप ६ लाख, ५० हजार प्रतीपर्यंत वाढला आहे. अमेरिकन लोकांत उठलेली ही एक लहरही असेल. पण त्या लहरीसाठी जास्त दाम मोजण्यास त्यांना दिक्कत वाटत नाही. उदाहरणार्थ, पहिल्या प्रतीच्या मोठ्या आकाराच्या अंड्यांसाठी १·३० डॉलर्स अथवा पावणेदहा रुपये मोजावे लागतात.

## साखरेचे उत्पादन गरजेपेक्षा जास्त

तीन वर्षांपूर्वी साखरेची भयंकर चणचण होती, परंतु आता साखरेचा पुरवठा इतका भरपूर आहे, की कोणत्याही सणासमारंभासाठी खास कोटा जाहीर करण्यास राज्यसरकारे तत्पर असतात. मागील मोसमातील २० लक्ष टन साखर शिल्लक आहे. त्यात २०० कोटी रुपये गुंतून पडले आहेत. चालू वर्षीच्या उत्पादनाच्या ताज्या आकड्यांप्रमाणे उत्पादन ४२ लक्ष टन झाले. त्यापूर्वीच्या वर्षअखेर १४ लक्ष टन साखर शिल्लक होती. अंतर्गत खप सुमारे ३४ लक्ष टनांचा आहे. पुढील वर्षी खप ३८ लक्ष टनांवर जाईल, अशी अपेक्षा आहे.

## ला. इं. कॉर्पोरेशनचे श्री. एम. आर. भिडे व्होल्टासमध्ये

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या चेअरमन पदावरून निवृत्त झालेले श्री. एम. आर. भिडे ह्यांची व्होल्टास ह्या टाटांच्या कंपनीचे व्हाइस चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर ह्या जागी दरमहा ७,००० रु. पगार आणि कंपनीच्या निव्वळ नफ्यावर एक टक्का कमिशन, अशा अटींवर नेमणूक झाली आहे. कंपनी लॉ बोर्डाने त्यास मंजुरी दिली आहे.

### किडीचा नाश करणाऱ्या नैसर्गिक औषधाचा शोध

पिकावरील, फळावरील व भाजीपाल्यावरील किडीचा नाश करण्यासाठी डी. डी. टी. सारखी रसायने त्यावर फवारण्यात येतात. परंतु ही विषारी औषधे माणसाला व प्राण्यांनाही आरोग्य घातक ठरण्याचा संभव असतो. मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलजी डिपार्टमेंटने कीडनाशक नैसर्गिक जंतू औषध शोधण्याचे प्रयत्न चालविले आहेत. संशोधनाचे काम प्रा. काणे आणि डॉ. टिपणीस हे करीत आहेत. भारतामधील काही औषधी वनस्पतींचा अर्क काढून त्यांचा किडीच्या नाशासाठी उपयोग करण्यासाठी त्याची पाहणी चालू आहे. संशोधनासाठी अमेरिकेच्या शेतकी खात्याने १ लाख, ६५ हजार रुपयांची मदत दिलेली आहे. संशोधनात यश आल्यास माणसांना व जनावरांना कमीत कमी घातक अशा जंतुघ्न औषधाचा वापर करता येईल.

---

### निजामावर ४ लाख रुपयांच्या कराची आकारणी


हैद्राबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या कक्षेत माजी निजामाची अनेक प्रासादतुल्य निवासस्थाने आहेत. ह्या मालमत्तेवर कॉर्पोरेशनने ४ लाख रुपयांची करआकारणी केली आहे. माजी निजाम आणि कॉर्पोरेशन ह्यांच्यात एक करार झालेला आहे. त्यातील तरतुदीप्रमाणे कॉर्पोरेशन पुरवीत असलेल्या सोयी-सवलतीबद्दल निजाम दर साल ५० हजार रुपयांची रक्कम एकदम देत असे. काही वर्षांपूर्वी ह्या रकमेत वाढ करण्यात यावी अशी सूचना कॉर्पोरेशनने केली होती. पण निजामाच्या वारसांनी तिला विरोध केला. अखेर हे प्रकरण मध्यवर्ती सरकार-कडे गेले. सरकारने पूर्वीच्या कराराप्रमाणेच रक्कम घ्यावी असा सल्ला दिला. सध्याचे निजाम मीर बरकत अली अनेक मार्गांनी इस्टेट कमी करण्याच्या प्रयत्नात आहेत. आता तनखाबंदीमुळे प्रश्न अधिकच बिकट झाला आहे.

---

### माणसांच्या तुटवड्याचा परिणाम

जपानमध्ये काम करू शकणाऱ्या माणसांचा तुटवडा भासत आहे. त्याचा परिणाम म्हणून काही व्यापारी कंपन्यांनी गिऱ्हाइकांचे स्वागत करणाऱ्या मुलींच्या ऐवजी नकली बाहुल्या उपयोगात आणल्या आहेत. मोठमोठ्या जपानी कंपन्या आपल्या दारापाशी खुबसुरत तरुणी स्वागतासाठी ठेवीत असत. त्यांची जागा आता पूर्णाकृती बाहुल्यांनी घेतली आहे. जपानी गिऱ्हाइ-कांना मुलींची इतकी संवय झालेली आहे की ५० वर्षे चालत आलेली ही पद्धत बंद करण्यात आली तर गिऱ्हाईक अस्वस्थ होईल अशी भीती कंपन्यांना वाटते. जपानमधील ग्रामीण भागांतील मद्यालयातही ही पद्धत पसरली आहे. एका मद्यालयाच्या चालकांनी दाराशी ठेवलेली नकली तरुणी गिऱ्हाइकांचे स्वागत करते आणि आल्याबद्दल त्यांचे आभार मानते.

---


**GADRE BROTHERS**

**ENGINEERS & FOUNDERS**

**MADHAVNAGAR [S. Rly.]**

Phone : 318 Sangli | Gram : 'SEWA Madhavnagar

# THE BELGAUM BANK LIMITED

Estd. 1930

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

**Share Capital : Rs. Over 8 Lakhs**
**Reserves : Rs. Over 8½ Lakhs**
**Deposits : Rs. 5 Crores & 75 Lakhs**


39 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

**S. Y. KAMAT**
*General Manager.*

**K. B. KIRTIKAR**
*Chairman.*

# विविधोपयोगिता


किर्लोस्कर पंपांचे हे वैशिष्ट्य होय !



गेल्या अर्ध शतकाहून अधिक काळ आम्ही अनेक प्रकारच्या उपयोगांसाठी विविध प्रकारचे पंप तयार करीत आहो. किर्लोस्कर पंपाच्या प्रत्येक भागांत आमची श्रेष्ठ दर्जाबद्दलची परंपरा आणि उत्पादनाचा दीर्घ अनुभव व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संयोग झाला आहे.

**विविध प्रकारच्या**
**किर्लोस्कर पंपांची उपयुक्तता**

• शेतीला पाणी पुरवठा • पिकावर पाणी शिंपडण्याच्या योजना • वॉटर वर्क्स • बूस्टर सर्व्हिस
• सीवेज • ड्रेनेज • सँडी वॉटर • स्टॉर्म वॉटर
• फायर फायटिंग • खाणी • रासायनिक, कागद व साखर कारखाने • प्रोसेसिंग प्लँटस् • व्हिस्कस लिक्विडस्
• तेलशुद्धि कारखाने • डेअरीज • डिस्टिलरीज
• खत कारखाने




किर्लोस्कर®

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड**
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-२.

STUSA Q/@

## रशिआच्या चंद्रयानाचा तांत्रिक विजय

लूना १६ हे रशिआने चंद्रयान पृथ्वीवर परतले आहे. गेल्या वर्षी रशियाने लूना १५ हे चंद्रयान चंद्रावर उतरून तेथील खडकाचे नमुने गोळा करून आणण्यासाठी पाठविले होते. पण चंद्रभूमीवर अलगद उतरण्यात यश न आल्याने ते कोसळले आणि प्रयोग फसला. ह्या वेळी मात्र चंद्रयान व्यवस्थितपणे चंद्रावर उतरले. त्यातील खोदाईच्या यंत्राने चंद्राचा पृष्ठभाग ३२० मिलिमीटरपर्यंत खोदून चंद्रभूमीचे नमुने गोळा केले. त्यानंतर चंद्रयानाने चंद्रपृष्ठावरून उड्डाण करून पृथ्वीकडे परत झेप घेतली. रशिअन तंत्रज्ञानाने मिळविलेला हा फार मोठा विजय म्हणावा लागेल. चंद्रयानाच्या उड्डाणाच्या व कार्याच्या सर्व अवस्थांवर रशिआतील उड्डाण स्थानकावरून नियंत्रण ठेवण्यात आले होते. ह्या चंद्रयानात मनुष्य नव्हता. अमेरिकेने गेल्यावर्षी चंद्रावर मानवाच्या पावलाचे पहिले ठसे उमटविले. ह्या यशस्वी प्रयोगातील नाट्य व साहस रशिआच्या यशात अर्थातच नव्हते. पण त्याचबरोबर चंद्राची माहिती करून घेण्यासाठी तेथे माणसे पाठविणेच आवश्यक नाही, ह्याची खातरजमा रशिआच्या ताज्या यशाने होते. चंद्रयानातून माणसे पाठविणे हे काम अतीशय खर्चाचे आणि धोक्याचेही आहे. अमेरिकेच्या अपोलो १३ च्या अंतरिक्ष प्रवाशांवर जीवाला मुकण्याचा प्रसंग ओढवला होता. अमेरिकेच्या सध्याच्या सरकारने अवकाश संशोधनावरील खर्च आता कमी केला आहे. रशिआतील अवकाश संशोधनाचे प्रयोग अवाढव्य खर्चाचे असून भागणार नाही. रशिआला ते डोईजड ठरण्याची शक्यता आहे.

---

## यात्रेच्या मिषाने जाऊन परीक्षेला बसणारे डॉक्टर्स

सिलोनमध्ये यात्रेच्या मिषाने आलेले ७५० हिंदी डॉक्टर्स अमेरिकेतील एका वैद्यकीय परीक्षेला बसणार आहेत. भारतात ह्या परीक्षेला बसण्यावर बंदी घालण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी अमेरिकेच्या एज्युकेशन फौंडेशन फॉर रजिस्ट्रेशन ऑफ फॉरिन मेडिकल ग्रॅज्युएशन ह्या संघटनेतर्फे ही परीक्षा भारतात घेण्यात येत असे, पण भारतामधील हुषार तरुणांचा परदेशात जाणारा ओघ थांबवावा म्हणून परीक्षेला बंदी घालण्यात आली. तेव्हापासून भारतामधील ज्या वैद्यकीय व्यवसायिकांना अमेरिकेत नोकऱ्या हव्या असतात असे लोक सिलोनला जाऊन परिक्षेला बसू लागले. परदेशी चलनाच्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी ते यात्रेकरू असल्याच्या मिषाने सिलोनला जातात. ह्यावर्षी होणाऱ्या परिक्षेस ७५० हिंदी डॉक्टरांबरोबर ४०० सिलोनी डॉक्टर्सही परिक्षेस बसणार आहेत.

---


तारेचा पत्ता : "मॉर्गेज"
दूरध्वनी : मुख्य कार्यालय २६७८०१/२/३
कार्यकारी संचालक २६१४९७

**दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.**

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६९ अखेर बँकेचे भागभांडवल ६ कोटी ६६ लाख, गंगाजळी ४५ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २८ कोटी व येणे कर्ज ८५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले — व्यवस्थापक
जी. पी. भावे — कार्यकारी संचालक



**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

# नहीं –
# यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड


सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: २७६१०१

# छोट्या माणसाची सतत सेवा हीच आमची अभिमानास्पद परंपरा !



आपल्या छोटयाछोटया उद्योगातून जे
राष्ट्रीय संपत्ती निर्माण करतात अशा
महत्वाच्या थोर व्यक्तींपैकी तुम्ही एक आहात का ?



३५०० हून अधिक छोटया - उद्योगांना
आमचे अर्थिक सहाय्य लाभले आहे.
सुमारे २० कोटींच्या घरात.

**संपन्नतेची वाटचाल करणाऱ्या या**
**समूहात तुम्ही का सहभागी होत नाही ?**
**अधिकाधिक संपन्न होण्यासाठी !**

तपशीलासाठी आजच चौकशी करा:

# बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )